बातमीपत्र

# पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

**माहिती कक्ष, दि २६ मार्च २०२४**

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १८०/२०२४ भादवि ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २३/०३/२०२४ रोजी १२.०० वा ते १४.०० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरासमोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २५/०३/२०२४ रोजी २३.०९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | गोपाळ परशुराम इंगळे, वय- ५० वर्षे, रा. ३२/९५, जुनी मिल चाळ, सुपर मार्केट जवळ, मुरारजी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ४०,०००/- रु लाल काळया रंगाची हिरो एच एफ डिलक्स मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची व किंमतीची मोटार सायकल क्रं एम एच १३ डी जे ८५७१ ही राहते घरासमोर रोडवर हॅन्डल लॉक करुन लावली असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपास:- पोना/ ७३२ कामुर्ती- ७६५०२७३२७३ |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २१८/२०२४ भादवि ३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २४/०३/२०२४ रोजी, २०.३० वा चे सुमारास, जेम्स जंगम ऑफिस जवळ, उत्तर सदर बझार, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २५/०३/२०२४ रोजी ०७.४६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | दयासागर स्वामेल करीमोळु, वय- १९ वर्षे, रा. ८४१, रा. ेम्स जंगम ऑफिस जवळ, उत्तर सदर बझार, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) आनंद तल्लारे, २) गणेश सजन, रा. सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व फिर्यादीचा मित्र असे दोघे चेष्टामस्करी करीत असताना तेवढयात आरोपीत क्रं. १ व २ हे फिर्यादीच्या घराजवळुन जात असताना, आरोपीत क्रं. १ फिर्यादीस म्हणाले की तुम्ही इथे चेष्टामस्करी करु नका बे, तेव्हा फिर्यादी म्हणाले की माझ्या घराजवळ मी काही पण करु तुला काय करायचे आहे असे म्हणाल्यामुळे या गोष्टीचा राग येवून फिर्यादी व फिर्यादीचा मित्र यांना वरील आरोपीतांनी शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण करुन, आरोपीत क्रं. १ याने लोखंडी रॉडने फिर्यादीच्या नाकावर मारुन फिर्यादीस जखमी केले आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ९८७ कंचे- ८३७८९८०९८७ |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १४९/२०२४ भादवि ३२६,५०४,५०६, प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २३/०३/२०२४ रोजी, १०.०० वा चे सुमारास, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २५/०३/२०२४ रोजी २३.११ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | राजेश अशोक सिंदगीकर, वय- ५१ वर्षे, रा. ७ अ माशाळ वस्ती, विजापूर रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) राकेश अशोक सिंदगीकर, वय- ४१ वर्षे, रा. ७ अ माशाळ वस्ती, विजापूर रोड, |

| | | |
|---|---|---|
| | | सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीत मजकुर याने फिर्यादीस राहते घरजागेवून वाद करुन, वरील आरोपीताने फिर्यादीस लाकडी स्टंप ने डोकीत, पाठीवर, डावे हाताला मारहाण करुन गंभीर जखमी केले आहे म्हणून. तपासः- सपोनि- चव्हाण- **९०११०९०९७५** |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १५०/२०२४ भादवि ३२४,५०४,५०६, प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २४/०३/२०२४ रोजी, २२.०० वा चे सुमारास, फिर्यादीचे राहते घरासमोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २५/०३/२०२४ रोजी २३.२५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | श्रीकांत परशुराम राठोड, वय- २८ वर्षे, रा. कुलकर्णी तांडा, हत्तुर विजापूर रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | मोहन शंकर राठोड, रा. कुलगर्णी तांडा, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे राजु भैरु राठोड यांच्या शेतीच्या रस्त्यावर लाकडे गोळा करत असताना, यातील वरील आरोपीत मजकुर याने शिवीगाळ करुन फिर्यादीस दगडाने मारहाण करुन फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिली आहे म्हणून. तपासः- पोना/ १७७० शेळके- ७२६४९३१८३२ |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १७९/२०२४ भादवि १४३,१४७,१४९,३२४,३२३,५०४,५०६ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २५/०३/२०२४ रोजी, ११.०० वा चे सुमारास, मयुर लॉज समोर, शिवाजी चौक, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २५/०३/२०२४ रोजी २१.०७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | रोहित भार मस्के, वय- ३३ वर्षे, रा. १३३, क्रांती नगर, गौतमी चौक, देगाव रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) सुरज मोरे, २) अतिश मोरे, व ३) त्याचे सोबतचे इतर सहा साथीदार नाव,माहित नाही. सर्व रा. सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे चहा पिण्याकरीता रेल्वे स्टेशन समोर कॅन्टीन वर गेले असता, तेथील गुरप्रसाद हॉटेल समोरील फुटपाथवर अनाधिकृत बोर मारल्याचे निदर्शनास आल्याने फिर्यादी मोबाईलव्दारे अनधिकृत बोरची शुटींग केली. त्यानंतर फिर्यादी सदरबाबत तक्रार देण्याकरीता महानगरपालिका येथे जात असताना गुरुप्रसाद हॉटलचे मालक यांनी फिर्यादीस फोन करुन वरील ठिकाणी येण्यास सांगितले. फिर्यादी वरील ठिकाणी गेले असता, वरील आरोपीतांनी फिर्यादीस तु आमचे हॉटेलसमोरील बोरचे व्हिडीओ शुटींग का केला असे विचारता, फिर्यादीने तुमची बोर ही फुटपाथ वरती असुन ती अनाधिकृत आहे. असे सांगितले असता, वरील आरोपीतांनी फिर्यादीस तुला काय करायचे आहे. आम्हाला काय करायचे ते करुन असे म्हणून व्हिडीओ डिलीट मार म्हणून शिवीगाळ करत थांब तुला बघतो असे म्हणून आरोपीत क्रं. १ याने हातातील फायटरचे फिर्यादीचे डोकीत मारुन जखमी केले. तसेच आरोपीत क्रं. २ व त्यांचे साथिदार यांनी मिळुन हाताने लाथाबुक्याने मारहाण करुन, आरोपीत क्रं. २ याने समारील दुकानातुन रॉड आणुन फिर्यादीचे डावे पायावर मारले आहे. तसेच तो व्हिडीओ डिलीट कर नाहतर तुला खल्लास करतो म्हणून धमकी दिली आहे म्हणून. तपासः- पोना/ १३३४ भद्रशेट्टी- ८८८८९७७७० |